**पंतप्रधानांचा 17 व्या (रिओ दि जानेरो, ब्राझील) ब्रिक्स शिखर परिषदेत सहभाग (06 जुलै 2025)**

06 जुलै 2025

6-7 जुलै 2025 दरम्यान ब्राझील स्थित रिओ दि जानेरो येथे पार पडलेल्या 17 व्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज सहभागी नोंदविला. जागतिक प्रशासनात सुधारणा, ग्लोबल साउथचा आवाज उंचावणे, शांतता आणि सुरक्षा, बहुपक्षीयता बळकट करणे, विकासाचे मुद्दे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासह ब्रिक्स अजेंडावरील विविध मुद्द्यांवर नेत्यांमध्ये फलदायी चर्चा पार पडली. पंतप्रधानांनी ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांचे त्यांच्या सौजन्यपूर्ण आदरातिथ्याबद्दल आणि शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आभार मानले.

2. "जागतिक प्रशासन आणि शांतता व सुरक्षिततेतील सुधारणा" या विषयावरील प्रारंभ सत्रात पंतप्रधानांनी संबोधन केले. त्यानंतर, पंतप्रधानांनी "बहुपक्षीय, आर्थिक-वित्तीय व्यवहार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता बळकट करणे" या विषयावरील सत्राला संबोधित केले. या सत्रात ब्रिक्स भागीदार आणि आमंत्रित देशांचा सहभाग होता.

3. जागतिक प्रशासन आणि शांतता व सुरक्षेवरील सत्राला संबोधित करताना पंतप्रधानांनी ग्लोबल साउथचा आवाज उंचाविण्यासाठी भारताची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली. हवामान वित्त आणि तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेच्या बाबतीत विकासशील देशांना शाश्वत विकासासाठी अधिक सहाय्य आवश्यक असल्याचे नमूद केले. 20 व्या शतकातील जागतिक संस्थांना 21व्या शतकातील आव्हानांचा सामना करण्याची क्षमता नसल्याचे निरीक्षण नोंदविताना, त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज अधोरेखित केली. बहुध्रुवीय आणि सर्वसमावेशक जागतिक व्यवस्थेचे आवाहन करताना पंतप्रधान म्हणाले की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, IMF, जागतिक बँक आणि WTO यासारख्या जागतिक प्रशासनाच्या संस्थांनी समकालीन वास्तविकता प्रतिबिंबित करण्यासाठी तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणांची निकड अधोरेखित केल्याबद्दल आणि शिखर परिषदेच्या जाहीरनाम्यात या मुद्द्यावर कठोर शब्दांचा अंतर्भाव केल्याबद्दल त्यांनी नेत्यांचे आभार मानले.

4. शांतता आणि सुरक्षिततेबाबत बोलताना पंतप्रधानांनी अधोरेखित केले की दहशतवाद हा मानवतेसमोरील एक गंभीर धोका आहे. या पार्श्वभूमीवर भाष्य करताना, त्यांनी अधोरेखित केले की, एप्रिल 2025 मध्ये पहलगाम दहशतवादी हल्ला केवळ भारतावरील नव्हे तर संपूर्ण मानवतेवरील हल्ला होता. दहशतवादाविरुद्ध जागतिक स्तरावर कडक कारवाई करण्याचे आवाहन करताना, पंतप्रधानांनी नमूद केले की दहशतवाद्यांना निधी देणाऱ्या, प्रोत्साहन देणाऱ्या किंवा सुरक्षित आश्रय देणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. दहशतवादाशी सामना करताना दुहेरी भूमिका असू नये यावर त्यांनी भर दिला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केल्याबद्दल त्यांनी ब्रिक्स नेत्यांचे आभार मानले.

दहशतवादाविरुद्ध जागतिक लढाई बळकट करण्याचे आवाहन ब्रिक्स देशांना करत या धोक्याला तोंड देण्यासाठी झिरो टॉलरन्स भूमिकेची अंमलबजावणी करण्याची गरज असण्यावर त्यांनी भर दिला.

5. या विषयावर अधिक तपशीलवार बोलताना, पंतप्रधानांनी नमूद केले की पश्चिम आशिया पासून युरोप पर्यंतचा संघर्ष हा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे.  त्यांनी पुढे असेही म्हटले की, भारताने नेहमीच अशा संघर्षांचे निराकरण करण्यासाठी संवाद आणि राजनैतिक मार्गाचे आवाहन केले आहे आणि अशा प्रयत्नांमध्ये योगदान देण्यास तयार आहे.

6. "बहुपक्षीयता, आर्थिक-वित्तीय व्यवहार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता बळकट करणे" या विषयावरील सत्राला संबोधित करताना, पंतप्रधानांनी विविधता आणि बहुध्रुवीयता ही ब्रिक्सची मौल्यवान ताकद असल्याचे व्यक्त केले.  याप्रसंगी पंतप्रधान म्हणाले, जेव्हा जागतिक व्यवस्था दबावाखाली होती आणि जागतिक समुदाय अनिश्चितता आणि आव्हानांना तोंड देत होता, तेव्हा ब्रिक्सची प्रासंगिकता स्पष्ट होती. बहुध्रुवीय जगाला आकार देण्यात ब्रिक्स महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असे ते पुढे म्हणाले.  या संदर्भात, त्यांनी चार सूचना दिल्या: 1. ब्रिक्स न्यू डेव्हलपमेंट बँकेने प्रकल्पांना अनुदान देण्यासाठी मागणी-चालित तत्त्व आणि दीर्घकालीन शाश्वततेचे पालन करणे; 2. गटाने विज्ञान आणि संशोधन गृह स्थापन करण्याचा विचार करणे. जो ग्लोबल साउथ देशांसाठी हितावह असेल; 3. दुर्मिळ खनिजांची पुरवठा साखळी सुरक्षित आणि लवचिक बनविण्यावर लक्ष केंद्रित करणे; आणि 4. गटाने जबाबदार एआयसाठी काम करणे - एआय प्रशासनाच्या चिंतेकडे लक्ष देताना, क्षेत्रातील नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यास देखील समान महत्त्व दिले पाहिजे.

7. नेतृत्व सत्राच्या समारोप वेळी, सदस्य देशांनी ‘रिओ दि जानेरो घोषणापत्राचा’ स्विकार केला [Link]. जागतिक प्रशासन [Link], शांतता आणि सुरक्षा [Link], आणि बहुपक्षीयता बळकट करणे, आर्थिक-वित्तीय व्यवहार आणि कृत्रिम बुद्धिमत्ता [Link] यावरील सत्रांमध्ये पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल.

रिओ दि जानेरो

06 जुलै 2025